**नक्षलवाद्यांच्या हल्ल्यांत जायबंदी/मृत्यू झालेल्या शासकीय सेवेतील व्यक्तीच्या कुटुंबियांना शासन सेवेत सामावून घेण्याबाबत.**

**अनुकंपा नियुक्तीच्या योजनेत सुधारणा करण्याबाबत.**

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय, क्रमांक :-अकंपा-१००६/प्र.क्र.१७४/०६/आठ
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक :- १७.७.२००७

संदर्भ :- १) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक:अकंपा-१०९३/२३३५/प्र.क्र.९०/९३/आठ, दिनांक २६ ऑगस्ट, १९९४
२) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक: अकंपा-१०९३/२३३५/प्र.क्र.९०/९३/आठ, दिनांक १२ मार्च, १९९७
३) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : अकंपा-१०००/प्र.क्र.२०/२०००/आठ, दिनांक २८ मार्च, २००१
४) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक: अकंपा-१००३/प्र.क्र.५९/२००३/आठ, दिनांक ३० जानेवारी, २००४
५) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक:अकंपा-१००४/प्र.क्र.५१/२००४/आठ, दिनांक २२ ऑगस्ट, २००५

नक्षवाद्यांनी केलेल्या हल्ल्यात जायबंदी/ठार झालेल्या शासकीय सेवेतील कुटूंबियांस शासन नोकरीत सामावून घेण्याबाबत व प्रचलित तरतूदीत काही सुधारणा करण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता. त्यामध्ये नक्षवाद्यांच्या हल्ल्यात जायबंदी/ठार झालेल्या शासकीय कर्मचाऱ्यांच्या कुटूंबियांना शासकीय सेवेत सामावून घेण्यासाठी वेगळी आरक्षण श्रेणी निर्माण करावी काय , तसेच गट 'अ' व गट 'ब' मधील कर्मचाऱ्यांचा सेवेत मृत्यू झाल्यास त्यांच्या कुटूंबियांना अनुकंपा नियुक्तीचा लाभ द्यावा काय, प्रचलित पध्दतीप्रमाणे अनुकंपा नियुक्तीसाठी गट 'क' व 'ड' मधील प्रतिवर्षी रिक्त होणाऱ्या पदांपैकी ५ टक्के विहित केलेली पदांची मर्यादा वाढवावी काय, अनुकंपा नियुक्तीसाठी पात्र ठरविलेल्या कुटूंबियांमध्ये अनुकंपा नियुक्तीसाठी पात्र ठरविलेल्या कर्मचाऱ्यांच्या कुटूंबियांमध्ये घटस्फोटीत/परित्यक्ता/विधवा मुलींना/बहिणींना पात्र कुटुंबिय म्हणून समाविष्ट करावे काय, प्रचलित तरतूदीनुसार वयाची ४० वर्षे झालेल्या कुटूंबियांस अनुकंपा नियुक्तीसाठी अपात्र ठरविण्यासाठी अट कर्मचाऱ्यांच्या विधवा तसेच घटस्फोटीत/परित्यक्ता/विधवा मुलगी/बहीणी यांच्याकरीता शिथिल करावी काय. याबाबतचे प्रश्न शासनाच्या विचाराधीन होते. यासर्व बांबींचा विचार करून शासन आता पुढीलप्रमाणे आदेश देत आहे.

**कृ.मा.प.**

**शासन निर्णय :**

यासंदर्भात आता सांगोपांग विचार करून शासनाने प्रचलित अनुकंपा तत्वावरील नियुक्तीच्या योजनेत सुधारणा करण्याचा निर्णय घेतला असून त्यानुसार खालील सुधारणा प्रचलित योजनेत समाविष्ट करण्यात येत आहेत :-

**१) गट अ/ब/क/ड मधील शासकीय अधिकारी अथवा कर्मचाऱ्यांना नक्षलवादी/आतंकवादी/दरोडेखोर/समाजविघातक यांच्या हल्ल्यात/कारवाईत मृत्यू आल्यास अशा अधिकारी अथवा कर्मचाऱ्यांच्या पात्र कुटुंबियांतील एका व्यक्तीस अनुकंपा नियुक्ती अनुज्ञेय राहील व या प्रयोजनार्थ प्रचलित योजनेत विहित केलेल्या ५ टक्के मर्यादेमध्ये त्यांना प्राधान्याने नियुक्ती देण्यात यावी.**

**२) गट अ/ब/क/ड मधील जे शासकीय अधिकारी अथवा कर्मचारी नक्षलवादी/आतंकवादी/दरोडेखोर/समाजविघातक यांच्या हल्ल्यात/कारवाईमध्ये कायम स्वरूपी जायबंदी झाले आहेत व त्यांनी स्वतःहून शासकीय सेवा सोडून देण्याची लेखी अनुमती दिली आहे अशा अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या पात्र कुटुंबियांतील एका व्यक्तीस वर विहित केलेल्या ५ टक्के मर्यादेमध्ये प्राधान्याने नियुक्ती देण्यात यावी.**

**३) अनुकंपा नियुक्तीसाठी पात्र ठरविलेल्या कुटूंबियांच्या व्याख्येची व्याप्ती वाढवून त्यामध्ये घटस्फोटित/परीत्यक्ता/विधवा मुलींना/बहिणींना पात्र कुटूंबिय म्हणून समाविष्ट करण्यात यावे. मात्र, याबाबत मृत अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या पत्नी/पति ने कोणाची अनुकंपा तत्वावर नियुक्ती करावी याबाबत नामांकन देणे आवश्यक राहील. मृत अधिकारी/कर्मचाऱ्यांचे पति/पत्नी हयात नसल्यास त्याच्या/तिच्या सर्व पात्र कुटुंबियांनी एकत्रित येऊन कोणाची नियुक्ती करावी याबाबत नामांकन करावे.**

वरील सुधारणा त्वरीत परीणामाने शासन निर्णयाच्या दिनांकापासून अंमलात येत असून वरील सुधारणांव्यतिरिक्त अनुकपां नियुक्तीच्या योजनेतील प्रचलित इतर तरतुदी यापुढेही कायम राहतील. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करून करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २००७०७१७१५३४४१००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

**सही /-**

**(श्री. प्र. पाटील)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रति,

मा.राज्यपालांच सचिव,मलबार हिल मुंबई,
मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
मा.उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
मा.मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
मुख्य सचिव,
सर्व मंत्रालयीन विभागांचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,
सर्व मंत्रालयीन विभाग,